| पुणे पोलीस | वाहतुक शाखा, पुणे शहर<br>पोलीस उप आयुक्त, वाहतुक यांचे कार्यालय,<br>बंगला नं ६ येरवडा पोस्ट ऑफीस शेजारी, पुणे | |
|---|---|---|

जावक क्रमांक –पोउपआ/वाह/नियो./१२ /२०२४ दिनांक :- ३ /०१/२०२४

## प्रेसनोट

पुणे महानगरपालिका प्रकल्प विभागामार्फत घोरपडी, बी.टी. कवडे रोड, थोपटे चौक येथे रेल्वे उड्डाणपुलाचे काम सुरु असुन दि. ०६/०१/२०२४ ते दि. ०८/०१/२०२४ रोजी दरम्यान रेल्वे उड्डाणपुलाचे गर्डर लाँचींगचे काम करण्यात येणार आहे. सदरचे काम करताना वाहतूकीस अडथळा अगर काही प्रकार होवू नये याकरीता सुरक्षेच्या दृष्टीकोनातुन सदर परिसरातील वाहतूकीत बदल करणे आवश्यक आहे. याकरीता महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र.एम.व्ही. ए.०१९६/८७१/ सीआर-३७/टीआरए-२, दिनांक २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी विजयकुमार मगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक, पुणे शहर बी.टी. कवडे रोड, थोपटे चौक ते भारत फोर्ज कंपनीकडे जाणारा रस्त्यावरील वाहतूकीत खालीलप्रमाणे तात्पुरत्या स्वरुपात बदल करीत आहे.

- बी.टी. कवडे रोड, थोपटे चौक ते भारत फोर्ज कंपनीकडे जाणारा रस्ता **दि. ०६/०१/२०२४ ते दि. ०८/०१/२०२४ रोजी पर्यंत सकाळी ०८.०० ते १६.०० वा. दरम्यान सुरक्षेच्या कारणास्तव बंद करण्यात येत आहे.**

✓ **पर्यायी मार्ग** :- सदर कालावधीत वाहनचालकांनी बी.टी. कवडे रोडवरील स्मार्ट पॉईंट / वनराज कॉर्नर ते छत्रपती शिवाजी महाराज चौक (बी.टी. शिर्के कंपनी गेट क्र. १) वठारे मळा या रस्त्याचा वापर करावा.

( विजयकुमार मगर )
पोलीस उप-आयुक्त, वाहतूक
पुणे शहर

**प्रत :- सर्व संबंधितांना**